स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३Website-www.sscboardkolhapur.inEmail Id- divsec.kop@gmail.com

**परिपत्रक /क्र.कोविमं./माध्य.परीक्षा /~~उच्च माध्यमिक~~/ 1714** **दिनांक :- ०९/०९/२०२२**

प्रति,

मुख्याध्यापक/ प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली/ कोल्हापूर.

**विषय :- जुलै-ऑगस्ट २०२२ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मूळ गुणपत्रिका वितरणाबाबत..**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, **जुलै-ऑगस्ट २०२२** माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा परीक्षेस आपल्या शाळेमार्फत व क.महाविद्यालयामार्फत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका व तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख, यांचे वाटप माध्यमिक शाळांना **दिनांक १४/०९/२०२२ रोजी सकाळी ११.००** वा. मंडळाच्या अधिकृत वितरण केंद्रमार्फत करण्यात येणार आहे याची सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी नोंद घ्यावी. साहित्य घेऊन जाणेसाठी **आपले अधिकारपत्र व शिक्क्यासह** आपल्या शाळेचा प्रतिनिधी पाठवून साहित्य घेऊन जाणेची दक्षता घ्यावी. गुणपत्रिकांचे वाटप **बुधवार दिनांक १४ /०९/२०२२ रोजी दु.३.००** वा. विद्यार्थ्यांना करावयाचे आहे.

गुणपत्रिका विद्यार्थ्यांना हस्तपोच देण्यापुर्वी शाळेच्या अभिलेखावरुन पडताळणी करुन **नावांतील स्पेलिंग, विषय इत्यादी सर्व माहिती बरोबर असल्याची व गुणपत्रिकेवर विभागीय सचिवांची स्वाक्षरी असल्याची खातरजमा करुन त्यानंतरच विद्यार्थ्यांना देण्यात यावे.** त्रुटी असणारे गुणपत्रक कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना देण्यात येऊ नये. गुणपत्रकात कोणतीही त्रुटी असल्यास तसेच गुणपत्रकांची संख्या कमी अधिक असल्यास विनाविलंब मंडळाशी संपर्क साधावा. **त्रुटी असणाऱ्या गुणपत्रिका मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत दिनांक १३/१०/२०२२ पूर्वी मंडळाकडून दुरुस्त करुन घेणेबाबत दक्षता घ्यावी. दुरुस्ती प्रस्तावासोबत योग्य ते दुरुस्ती शुल्क तसेच प्रमाणित केलेली माध्यमिक शाळेच्या व क.महाविद्यालयाच्या जनरल रजिस्टरच्या पानाची छायांकित प्रत सादर करावी.** तसेच यापूर्वी दुरुस्ती का कळविली नाही याबाबतच्या खुलाशासह जनरल रजिस्टर घेऊन मुख्याध्यापक व प्रतिनिधींनी समक्ष मंडळ कार्यालयात आल्यानंतरच दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल. त्यानंतर काही त्रुटी राहिल्यास त्यास आपली सर्वस्वी जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

**गुणपत्रिका दुरुस्तीसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे -**

**२. शाळेचे शिफारस पत्र २.मुळ गुणपत्रक ३. जनरल रजिस्टरची प्रमाणित छायांप्रत ४. लिपिकांनी मुख्याध्यापकांना दिलेला खुलासा (प्रिलिस्ट दुरुस्ती का कळविली नाही याबाबत) ५. मुख्याध्यापकांनी मंडळास दिलेला खुलासा ६. आधारकार्ड छायाप्रत ७. दुरुस्ती शुल्क रु.१५०/-**

तरी सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुखांनी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सर्व सूचनांची नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

( डी.एस.पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

**महत्वाचे :- जुलै-ऑगस्ट २०२२ परीक्षेसाठी श्रेणीसुधार योजनेअंतर्गत (Class Improvement) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी जुलै-ऑगस्ट २०२२ परीक्षेच्या मुळ गुणपत्रिका माध्यमिक शाळा व क.महाविद्यालयांनी वितरीत केलेच्या दिनांकानंतर पुढील एक महिन्यापर्यंत विकल्प देणे अनिर्वाय राहील. तसेच गुणपत्रिका वितरीत केलेच्या दिनांकानंतर पुढील सहा महिन्यापर्यंत जादा शुल्क आकारुन विकल्प स्विकारता येईल. या कालावधीत विकल्प न दिल्यास जुलै-ऑगस्ट २०२२ परीक्षेची संपादणूक रद्द करुन पूर्वीच्याच परीक्षेची संपादणूक ग्राह्य धरण्यात येईल याची नोंद घ्यावी व तसे संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात यावे.**